# प्रस्तावना

# प्रकरण — 1

## प्रस्तावना

१. भौगोलिक वैशिष्ठ्ये --

बावडा हे संस्थान कोल्हापूर राज्याच्या पश्चिमेस असून याचे क्षेत्रफळ ४४३ चौ.मैल होते. या संस्थानच्या पूर्व, उत्तर व दक्षिण या बाजुस कोल्हापूर राज्याची सीमा होती. या संस्थानची पूर्व पश्चिम लांबी सुमारे ४० मैल व दक्षिणोत्तर रुंदी सुमारे २५ मैल होती.[१]

सतराव्या आणि आठराव्या शतकात गगनबावडा संस्थानाची लोकसंख्या आणि इतर भौगोलिक वैशिष्ठ्यांची माहिती तत्कालीन साधनातून उपलब्ध नाही. तथापि विसाव्या शतकातील उपलब्ध माहितीवरुन भौगोलिक वैशिष्ठ्यां विषयीचा अंदाज करता येईल.

या संस्थाना मध्ये १९११ च्या जणगणनेनुसार ४५,४६५ इतकी लोकसंख्या असून ६९ गावे होती[२] तर १९५१ च्या जणगणनेनुसार ५२९२२ लोकसंख्या होती आणि ७६ गावे होती[३]. या काळात संस्थाना मधील १२,७००० एकर जमीन लागवडीयोग्य असून ७५,००० एकर जमिनीवर जंगल आहे.

हा प्रदेश जंगलाने व डोंगर दऱ्यानी व्यापलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी पाऊस सुध्दा भरपूर पडत असतो. १९३८-३९ च्या प्रशासकीय रिपोर्टवरुन या संस्थानात ३२० इंच पाऊस पडला होता.[४] या ठिकाणचे पावसाचे सरासरी प्रमाण २५० इंच इतके आहे. या प्रदेशामध्ये भोगावती व भद्रा या दोन महत्वाच्या नद्या उगम पावतात.या संस्थानातील जमिनीमध्ये भात,नागली ,वरी, उडिद, कुळीथ, तीळ,भुईमूग ही पिके घेतात. त्याचप्रमाणे काही भागात फणस,अननस, कोहाळे, चांगले पिकतात, तरी सुध्दा या प्रदेशातील लोकांची स्थिती अत्यंत गरिबीची असलेली दिसून येते.

या प्रदेशात शिवगड व गगनगड हे दोन महत्वाचे किल्ले आहेत. गगनगड हा किल्ला पन्हाळ्याच्या भोज राजाने इ.स.११८० ते १२०९ च्या दरम्यान बांधला असावा. हा किल्ला १६६० मध्ये मराठ्यांच्या ताब्यात आला. शिवाजीने निळो सोनदेव यास जहागीर दिला. यानंतर अजून पर्यन्त हा किल्ला व प्रदेश त्याच घराण्याकडे आहे.

## पंत अमात्य बावडेकर यांचा मूळ वृत्तांत
## ऐतिहासिक पार्श्वभूमि ---

छ.संभाजी महाराजांच्या वधानंतर स्वराज्यावर जे संकट कोसळले, त्यापासून संरक्षण करण्याची महत्वाची कामगिरी महाराष्ट्रातील ज्या थोर पुरुषांनी केली, त्यामध्ये रामचंद्रपंताचे नाव अग्रभागी आहे. छ.राजाराम महाराज कर्नाटकात जिंजी येथे असता महाराष्ट्रात स्वराज्याचा कारभार रामचंद्रपंत अमात्याने मोठ्या कौशल्याने केला. रामचंद्रपंत अमात्य म्हणजे मुरब्बी, मुत्सद्दी शिवछत्रपतीच्या राजनितीच्या व राजकारणाच्या तालमीत तयार झालेल्या पहिल्या प्रतिचा प्रशासक व राजकारणी पुरुष होता. "कोल्हापूरच्या राज्याची पूर्वतयारी स्थापना आणि आरंभीचा विकास या सर्व कामात सर्वात अधिक वाटा उचलण्याची कामगिरी रामचंद्रपंत अमात्य यांनी पार पाडली. रामचंद्रपंताचा स्वराज्य स्थापनेच्या कार्याशी आरंभापासूनच घनिष्ठ संबंध असल्याचे स्पष्ट दिसते."[१]

रामचंद्रपंत अमात्याचे पूर्ण नाव रामचंद्र नीळकंठ भादाणेकर असे होते. क्वचित त्याना बहुतकर या आडनावानेही संबोधले जाई, हे देशस्थ ऋग्वेदी आश्वलायन सूत्राचे भारद्वाज गोत्री ब्राह्मण होते. हे तर्फ सोनवले येथील प्रांत कल्याण भिवंडी येथील वतनदार देशमुख, सोनवले तर्फेचे देशमुखीचे वतन रामचंद्र निळकंठ याचा सहावा पुर्वज नारोपंत याच्या पैशातून त्याचा भाऊ काळोपंत याने विकत घेतले होते.

इ.स.१४९० च्या सुमारास नोरोपंत व काळोपंत हे दोघे भाऊ भांदाणे तर्फ सोनवले प्रांत कल्याण येथे रहात होते. घरच्या संसाराच्या अडचणी व आर्थिक अडचणी लक्षात घेऊन पैसा कमवायचा या हेतूने नारोपंत हे काळोपंतास घरी ठेऊन स्वत: कर्नाटकात गेले. त्या ठिकाणी लहानमोठी अनेक कामे केली व पैसा कमावला व घरी काळोपंताकडे पाठवला. या पैशातूनच सोनवले तर्फेचा अधिकारी महादप्रभु याच्याकडून इ.स.१५३३ मध्ये काळोपंताने सोनवले तर्फेचे देशमुखी चे वतन विकत घेतले. [६]

श्री ना.बनहट्टी हे आपल्या आज्ञापत्रामध्ये या विषयी म्हणतात, ''सोनवले तर्फेचे देशमुखीचे वतन रामचंद्र निळकंठ यांचा सहावा पुर्वज निळो नारायण याने शके १४४५ मध्ये खरेदी केले.''[७] तर सखनीसानी संपादीत केलेल्या पंत अमात्य बावडा दप्तरातील नोंदी नुसार हे नीळोपंतानी खरेदी केले होते. ''तर्फ सोनवले प्रांत मजकूर चे देशमुखीचे वतन आपले पुर्वी आपले वडील नीळोपंत होते त्यानी द्रव्य देऊन घेतले आणि भानजी मुरार यांचा वडील कालोपंत यास मुतालकिस ठेऊन आपण चाकरीनिमित्त बेदरास गेले.''[८] या बाबतीत राजवाडे यानी सुध्दा निळोपंतानी हे वतन विकत घेतले असे म्हटले आहे. ''निळोपंती शालीवाहन शके १५४५ चवदासे पचेचाळिसावे शकी नख्त टक्के १३००० देऊन वतन खरेदी केले.''[९]

याविषयी दुसरा एक उल्लेख महत्वाचा वाटतो तो म्हणजे १६९३ मधील राजाराम महाराजानी रामचंद्रपंताना दिलेले एक आज्ञापत्र त्यामध्ये ''ता सोनवले प्रा-भिवंडी येथील देशमुखी आपल्या वडिलांनी भोगवटियानसी खादली आहे.''[१०]

या सर्व नोंदी वरुन हे सिध्द होते की १५३० च्या सुमारास निळोपंताने सोनवले प्रा भिवंडी हे वतन रोख १३००० टक्के देऊन महादप्रभु कडून खरेदी केले होते. पुढे निळोपंत नोकरीच्या निमित्ताने 'बेदरास' जाऊन राहिला. जात असताना त्याने आपल्या वतनाची देखरेख करण्यासाठी काळोपंत या भारद्वाज गोत्री ब्राह्मणाची नियुक्ती केली. यासंबंधी राजवाडे म्हणतात,

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"येते समयी कळोपंत बिन नागोजीपंत भारद्वाज गोत्री ब्राह्मण म्हणून होता. बरा लिहिणार म्हणोन यारेदी सांगून ठेविला होता. त्यास आपण हुजुर गेले ते समयी वतनाची देखरेख सांगितली "[११]

मात्र राम म. गोरे यानी काळोपंत हा निळोपंताचा चुलता होता असे सांगितले आहे पण ते चुकीचे वाटते कारण असा उल्लेख कुठल्याही साधनामध्ये मिळत नाही. म्हणून निळोपंताने बेदरास जात असतान काळोपंतास आपल्या वतनाच्या देखरेखीसाठी मुतालिक म्हणून ठेवले होते.... "राजश्री निळोपंताच्या आजियाचे वेळेस मुतालिक ठेविला होता"...[१२] सात आठ बेदरच्या बादशहाची नोकरी करून निळोपंत परत आपल्या वतनावर परत आले. त्यावेळी काळोपंताने निळोपंताबरोबर भांडणास सुरुवात केली व सोनवले प्रात भिवंडी चे वतन परत देण्यास नकार दिला. "राजश्री निळोपंताच्या आजियाचे वेळेस मुतालिक ठेविला होता तोच बळाऊन देशमुखी करावयास लागला "[१३] या वेळी निळोपंतानी बेदरच्या पादशहाचे फर्मान आणले व काळोपंताकडील आपले वतन स्वतःच्या ताब्यात घेतले. काळोपंत जवारचे कोळी यांच्या आश्रयास जाऊन राहिला.

पुढे निळोपंत वृध्द झाले. त्यावेळी ते भादाणे या ठिकाणी रहाण्यास होते. यावेळी काळोपंताचा नातु "मुरार सोमाजी" याने भादाण्यास येऊन निळोपंताच्या घरातील चौदा माणसांचे खून केले. त्यामध्ये निळोपंत बायका, मुले, चाकर, बटिकी, यांचा समावेश होता. ही चौदा माणसाची कत्तल कुणी केली याविषयी मात्र विविध मते आहेत. सबनीसानी प्रकाशित केलेल्या बावडा दप्तरानुसार ही कत्तल काळोपंतानी केली आहे. "काळोपंत जवारचे कोळी याकडे जाऊन त्याचा आश्रा करून निळोपंताकडील १४ खून केले..."[१४] राजवाडेंच्या मते मात्र ही कत्तल काळोपंताचा नातू मुरार सोमाजी याने केली आहे. "..याउपरि कित्तेका दिवसानी मुरार सोमाजी काळोपंताचा नातू याणे मारेकरी घेऊन मौजे भादाणे येथे निळोपंत होते त्यास व बायका मुले, चाकर बटिकी, देखील निळोपंत व त्याचे पुत्र नारोपंत मारिले".[१५]

राम म.गोरे यांनी सुध्दा या कत्तलीचा प्रमुख म्हणून काळोपंताचा नातू मुराराव असे सांगितले आहे.[१६] या घटनेविषयी ग.ह.खरे व भिडे हे आज्ञापत्राच्या प्रस्तावनेत म्हणतात ,

"सोनवळे तर्फेचा वतनाचा कारभार करीत असता कांही कामानिमित्त निळोपंत बेदरास गेले. जाताना त्यानी कालोपंत नावाच्या मनुष्यास गुमास्ता म्हणून ठेवले होते. निळोपंताच्या मागे कालोपंताने जव्हारकरांच्या मदतीने निळोपंताच्या घराण्यातील चौदा माणसांचे खून केले. त्या कत्तलीत फक्त निळोपंताचा नातू नारोपंत हा त्याच्या आईच्या हिकमतीने वाचला."[१७]

वरील सर्व मते लक्षात घेता ही कत्तल मुराराव ह्या काळोपंताच्या नातवाने केली असावी असे वाटते. कारण काळोपंत हा बराच वृध्द झालेला असणार आणि ह्या वयात त्याने चौदा माणसांचे खून करणे शक्य वाटत नाही म्हणून मुरार सोनाजी हा कालोपंताचा नातू याने ही कत्तल केली असावी कारण त्यावेळी तो तरुण होता व आपल्या पूर्वीच्या वतनाच्या अपेक्षेने ही कत्तल केली असणे शक्य आहे.

या कत्तलीमधून निळोपंताचा नातू नारोपंत यास त्याच्या आईने अतिशय हिकमतीने वाचवले व पुण्याजवळ कसबे खेडेबारे या ठिकाणी आली. त्या ठिकाणी ठकार नावाच्या सद्गृहस्थाने बाईस कन्येप्रमाणे मानून तिला आश्रय दिला.

> "कालोपंत जवारकर कोळी याकडे जाऊन त्याचा आश्रा करून निलोपंताकडील १४ खून केले त्यामध्ये नारोपंत निलोपंताचे नातू कृष्णाजीपंताचे पुत्र यास त्याचे मातेने जीनात लपवून वाचवले आणि वतन सोडून बाइको आपल्या माहेरास घाटावरी येऊन मुलाचे पालन केले."[१८]

खरे व भिडे यांनी सुध्दा आपल्या आज्ञापत्रात दिलेल्या वंशावळीत निळोपंताचा मुलगा कृष्णाजीपंत व त्याचा मुलगा नारोपंत असा उल्लेख केला आहे. गोरे यांच्या मते सुध्दा नारोपंत हा निळोपंताचा नातू होता.

या वेळी कृष्णारावाची बाळंत झालेली स्त्री आपल्या खोलीत होती, हा आक्रंत तिला समजला तेव्हा दंगेखोर तिच्यापर्यन्त येण्यापूर्वीच तिने आपला बारा दिवसाचा मुलगा जिनात लपवून त्यासुध्दा सवड पाहून सुरक्षित अशा जागी जाऊन राहिली.[१९]

या सर्व विवेचनावरून असे वाटते की, भादाणे या ठिकाणी काळोपंताचा नातू मुराररराव याणे निळोपंताच्या घरावर हल्ला केला आणि निळोपंता सह त्यांचा मुलगा कृष्णाजी पंत व इतर लोक यांच्यासह चौदा लोकांची कत्तल केली. या कत्तलीमधून कृष्णाजीपंताचा १२ दिवसाचा मुलगा नारोपंत यास त्याच्या आईने जीनात घालून लपवून ठेवले आणि नंतर ती त्यास घेऊन पुण्याजवळ कसबे खेडेबार या ठिकाणी आली. या ठिकाणी ठकार नावाच्या सद्गृहस्थाने या बाईस मुलीप्रमाणे मानून तिला आश्रय दिला.

> "तुमचे घरी बारा वर्षे आम्ही राहिलो. तुम्ही छत्रपती यांची भेट केली नंतर त्यांसी आम्हाविसी स्लांत बहुतपणे केली आणि आम्हास हे पद प्राप्त झाले."..[२०]

या नारोपंताचे बालपण ठकार घराण्यातच गेले पुढे त्यांच्याच मदतीने मालोजी राजे यांचेकडे काम करू लागला. नारोपंताने इ.स. १५८० ते १६०० च्या सुमारास शिवनेरी व चाकण याचे जहागिरदार मालोजी राजे भोसले यांचा आश्रय संपादन केला आणि मरेपर्यन्त एकनिष्ठेने सेवा केली व बरीच योग्यता मिळवली.

नारोपंतानंतर त्याचा मुलगा 'सोनोपंत हा शहाजी राजाच्या आश्रयास होता. औरंगजेबाच्या काही पत्रातून याचा उल्लेख सोनोपंत डबीर असा येतो. शिवजन्माच्या वेळी हा शिवनेरीवर हजर होता"[२१] नारोपंत व सोनोपंत ह्या दोघांनीही आपले गेलेले वतन परत मिळविण्याचा काहीही प्रयत्न केला नाही पण नारोपंताचा नातू निळो सोनदेव ( निळोपंत , निळकंठ ) यानी मात्र आपले वतन परत मिळविण्याचा प्रयत्न केला.

सोनोपंतांचे पुत्र आबाजी आणि निळोपंत ह्या दोघांनी शककर्ते शिवाजी महाराजांच्या अनेक कामगिऱ्या पार पाडल्या. इ.स.१६४४ पासून हे दोघे महाराजांच्याकडे नोकरी करीत होते.

इ.स.१६४८ मध्ये ते शिवाजी महाराजांचे सरकारकून बनले व स्वारीबरोबर कल्याणला आले. शिवाजी महाराजांचा कल्याणला मुक्काम असताना निळो सोनदेवांनी आपल्या वतनाची हकिगत सांगितली. त्यावरून महाराजांनी मुरारभानजी व इतर वतनदार याना बोलावून चौकशी केली व निळोपंतास हिस्सा मिळवून दिला. निळोपंताने मुरार भानजी यास मुतालिक नेमून आपण आपल्या हुद्याच्या कामावर गेला.[२१]

अशा रीतीने काळोपंत व निळोपंत यांच्यापासून ज्या वतनाकरिता अनेक गडबडी झाल्या ते शेवटी निळोपंताच्या वंशाकडे म्हणजेच निळो सोनदेवाकडे आले व अजूनपर्यन्त ते त्याच्याच घराण्याकडे आहे.

## प्रबंधाची रूपरेषा

प्रस्तुतच्या प्रबंधामध्ये गगनबावडा जहागिरीच्या इतिहासाचा इ.स.१८१० पर्यन्तचा भाग अभ्यासासाठी स्वीकारण्यात आला आहे. हा अभ्यास प्रामुख्याने राजकीय स्वरूपाचा आहे. पहिल्या प्रकरणामध्ये भौगोलिक परिस्थिती व राजकीय पूर्वेतिहास समाविष्ट केलेला आहे. गगनबावडा जहागिरीचा सर्वात जास्त प्रख्यात जहागिरदार हा रामचंद्रपंत अमात्य होता. या जहागिरीच्या इतिहासामध्ये आणि एकंदरीत मराठ्यांच्या इतिहासात रामचंद्रपंताच्या कारकीर्दीचे (१६७४-१७१६ ) महत्वाचे स्थान आहे. रामचंद्रपंताच्या कारकीर्दीचा अभ्यास दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकरणात केलेला आहे. दुसऱ्या प्रकरणात रामचंद्रपंताच्या कार्याचा आणि तिसऱ्यात व चौथ्यात त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केले आहे. पाचव्या प्रकरणात रामचंद्रपंताच्या नंतर बावड्याच्या जहागिरीवर पंत अमात्य म्हणून

आलेल्या भगवंतराव पंत अमात्यांच्या ( १७१८-१७५५ ) कारकिर्दीच्या,आणि सहाव्या प्रकरणात कृष्णराव भगवंत ( १७५५-१७६१ ) यांच्या कारकीर्दीत अभ्यास केला आहे. यांच्या कारकिर्दीत प्रामुख्याने त्यांची आई व्यंकुबाई हिनेच कारभार पाहिला आहे. सातव्या प्रकरणात सुबराव कृष्ण पंत अमात्य (१७६१-१८१०) यांच्या बावड्यातील कारकीर्दीचा आढावा घेतलेला आहे. शेवटच्या आठव्या प्रकरणात उपसंहाराचे आहे.

## प्रबंधासाठी वापरलेली साधने

प्रस्तुतच्या प्रबंधामध्ये प्रामुख्याने के.गो.सरदेसाईनी बावडा दप्तराची प्रकाशित केलेली पत्रे, राजवाडेंनी प्रकाशित केलेली बावडा दप्तरामधील पत्रे तसेच ताराबाईकालीन कागदपत्रे,जिजाबाई कालीन कागदपत्र व भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रकाशित केलेली शिवचरित्र साहित्य खंड, ही साधने प्रामुख्याने वापरलेली आहेत. तसेच या प्रबंधासाठी राम म.गोरे यांनी लिहिलेले पण आज अत्यंत दुर्मिळ असलेले 'बावडेकर पंत अमात्य हुकमतपन्हा यांचे वंशवृत्त' हे पुस्तक वापरलेले आहे. हे पुस्तक कधी प्रकाशित झाले याचा उल्लेख मिळत नाही,तरी सुध्दा १९०३ च्या पूर्वी प्रकाशित झाले असावे कारण राजवाडेंनी बावडा दप्तरातील कांही कागदपत्रे त्या खंडात प्रकाशित केली. या ८व्या खंडात त्यांनी गोरे गुरुजींनी बावडेकर घराण्याचा मुख्यवृत्तांत लिहिल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. म्हणून गोरेंचे हे पुस्तक महत्वाचे आहे असे वाटते.

या प्रकाशित साधनांशिवाय कोल्हापूर पुराभिलेखागार (कोल्हापूर जिल्हा रेकॉर्ड ऑफिस ) मधील कांही अप्रकाशित कागदपत्रे सुध्दा वापरली आहेत. विशेषतः ही कागदपत्रे बावडादप्तरातील रु.क्र.१ ते १५ या मधील आहेत. वस्तुतः हा प्रबंध राजकीय स्वरुपाचा आहे पण या वतनदारी पध्दतीचा समाजावर काय परिणाम झाला हे पहाण्यासाठी ही पत्रे वापरली आहेत.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वस्तुत: बावडा दप्तरातील असंख्य कागदपत्राचा अभ्यास होणे आवश्यक आहे. या दप्तरामध्ये धार्मिक, सामाजिक, राजकीय व इतर स्वरुपाची अनेक कागदपत्रे आहेत. यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. मी या मधील ठराविक सिलेक्टेड कागदपत्रे वापरुन हा प्रबंध लिहिला आहे.

टीपा


१ रा.म.गोरे , बावडेकर पंत अमात्य हुकुमतपन्हा यांचे वंशवृत्त
(प्रकाशनाचा तपशिल उपलब्ध नाही)
भूगोल भाग पे.क्र.

२ कोल्हापूर आणि सदर्न मराठा कंट्री स्टेटस्चे सन १९११ इसवी ... खानेसुमारीच्या गांववार व धर्मवार लोक संख्येचे पुस्तक ,
(कोल्हापूर : श्री व्यंकटेश्वर छापखाना १९१२) (ना.मा. भिडे सेन्सस कोल्हापूर यानी तयार केलेले )

३ Maharashtra State Gazetter Kolhapur District
( Bombay : Directorate of Govt.Printing Stationary and Publication Maharashtra State ,1960. ,

४ Kolhapur Administration Report ( 1938-39 ) ,
( Kolhapur : Government Press , 1939 )

५ स.मा.गर्गे , करवीर रियासत
(पुणे :राणे प्रकाशन, १९००); पृ.क्र.११५.

६ रा.म.गोरे , बावडेकर पंत अमात्य हुकुमतपन्हा यांचे वंशवृत्त,
(प्रकाशनाचा तपशिल उपलब्ध नाही),
पृ.क्र. २.

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री.ना.बनहट्टी (संपा.), | आज्ञापत्र (पुणे:सद्विचार प्रकाशन,१९८४) पृ.क्र.१९ |
| ८ | के.गो.सबनीस(संपा.), | पंत अमात्य बावडा दप्तर, (गगनबावडा: सेक्रेटरीज बावडा)पृ.क्र.११२. |
| ९ | वि.का.राजवाडे(संपा.), | मराठ्यांच्या इतिहासाची साधने, (कोल्हापूर:विजापूरकर वि.गो.,१९०३) खंड ८वा,पृ.क्र.३२. |
| १० | वि.त्र्य.शेटे,बा.नी.कानिटकर (संपा.), | शिव चरित्र साहित्य खंड ८वा, (पुणे: भारत इतिहास संशोधक मंडळ, ले.४२८,पृ.क्र.४२. |
| ११ | राजवाडे, | तत्रैव - पृ.क्र.३२. |
| १२ | शेटे,कानिटकर(संपा.), | तत्रैव - पृ.क्र.४२. |
| १३ | | कित्ता - पृ.क्र.४२ |
| १४ | सबनीस, | तत्रैव - पृ.क्र.११३. |
| १५ | राजवाडे, | तत्रैव - पृ.क्र.३३. |
| १६ | गोरे, | तत्रैव - पृ.क्र.४ |
| १७ | ग.ह.खरे,श्री.र.भिडे(संपा), | आज्ञापत्र, (पुणे: सिटी बुकस्टॉल प्रकाशन,१९६०), पृ.क्र. |
| १८ | सबनीस, | तत्रैव - पृ.क्र.११३. |
| १९ | गोरे, | तत्रैव - पृ.क्र.४. |

२० द.वा.पोतदार , .. 'ठकार घराणे' द.वा.पोतदार, ग.ना.मुजुमदार(संपा.) **ऐतिहासिक संकीर्ण-साहित्यखंड-१,** (पुणे: भारत इतिहास संशोधक मंडळ, १९३१, ले.क्र.११८,पृ.क्र.११७.

२१ स.आ.गायक्वाड(संपा.) , **करवीर सरदारांच्या कैफियती,** (कोल्हापूर :गायक्वाड,१९७१), वंशावळ, पृ.क्र.

२२ गोरे , तत्रैव - पृ.क्र.६.